**प्रेस नोट**

**पुणेमेट्रो च्या कामासाठी वल्लभ नगर बस थांबा तात्पुरता हलविला जाणार**

दि. 10/02/2020

महा मेट्रोच्या अंतर्गत पुणे पिंपरी-चिंचवड मेट्रोचे कॉरिडॉर 1 चे काम (पिंपरी ते रेंज हिल) प्रगतीपथावर सुरू आहे. सदर कामांमधील संत तुकाराम नगर मेट्रो स्टेशन च्या इंट्री एक्झिट दोन साठीच्या फूट ओव्हर ब्रिजचे काम सुरू आहे. यासंदर्भात वल्लभनगर बीआरटी बस स्थानक हे पाच मीटर पुणे दिशेने हलविण्याचे काम 11/02/2020 पासून सुरू होत आहे व हे काम 30 दिवसांपर्यंत चालेल . त्या दरम्यान वल्लभ नगर बीआरटी बस स्थानक बंद राहील. पर्यायी बस स्थानक बीआरटी बस स्थानकाच्या समोरील बाजूस सर्विस लाईनला लागून तयार करण्यात आलेले आहे. तरी पिंपरी दिशेने येणाऱ्या पुणे दिशेकडे जाणाऱ्या सर्व बसेस पर्यायी बस स्थानकावर थांबतील व तिथूनच प्रवासी ये-जा करू शकतील.

नागरिकांच्या गैरसोयीबद्दल खेद आहे. सहकार्याबद्दल धन्यवाद.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे ४११ ०१८
स्थापत्य बीआरटीएस विभाग
क्र.स्था/बीआरटीएस/ १६० /२०२०
दि. ०७/०२/२०२०

प्रति,
मा.मुख्य प्रकल्प व्यवस्थापक,
रिच-१ व २ (स्टेशन्स)
पुणे मेट्रो रेल प्रकल्प,
प्लॉट नं.५,१०१ ओरियन बिल्डींग,
कोरेगाव पार्क पुणे-०१

**विषय-** महामेट्रोचे संत तुकाराम नगर येथील मेट्रो स्टेशन चे FOB बांधकामासाठी वल्लभनगर बस स्टॉप पुणे बाजुस ५.०० मी. शिफ्ट करणेबाबत...

**संदर्भ-** १) आपले पत्र क्र. Mahametro/PMRD/LR1051 दि.२४/०१/२०२०

२) आपले पत्र क्र. Mahametro/PMRD/LR1061 दि.०४/०२/२०२०

३) मा.आयुक्त यांचा मान्य प्रस्ताव दि.२४/०१/२०२०

वरील विषयांकित महामेट्रोचे संत तुकाराम नगर येथील मेट्रो स्टेशन चे FOB बांधकामासाठी वल्लभनगर बस स्टॉप पुण्याकडील बाजुस ५.०० मी. शिफ्ट करणेबाबत आपण संदर्भ क्र.१ व २ नुसार परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे. याबाबत स्थळ पाहणी करुन मा.आयुक्त यांचेकडे प्रस्ताव सादर केला असता संदर्भ क्र.३ चे मंजुर टिपणीनुसार विषयांकित काम करणेस मा.आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. तरी खालील अटींस अधिन राहुन सदर कामास परवानगी देणेत येत आहे.

१. काम करणेची जागा संरक्षीत करावी.
२. कामाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक नेमावे. सुरक्षितते बाबतची सर्व जबाबदारी मेट्रोची राहील. सदर ठिकाणी काही दुर्घटना झाल्यास त्यास मनपा जबाबदार राहणार नाही.
३. बस थांबा तात्पुरता हलविले बाबत माहिती असलेला फलक लावुन प्रवाशांना मदत करावी.
४. तात्पुरत्या बस थांब्याच्या ठिकाणी प्रवाशांच्या सोईसाठी पर्यायी सिट आऊटची व्यवस्था करावी.
५. नव्याने ५.०० मी. लांबीच्या वाढीव बस स्टॉपचे काम करताना मनपाचे कनिष्ठ अभियंता/उप अभियंता यांना अवगत करावे.

६. सदर बस थांब्याच्या बांधकामाची व स्ट्रक्चरल डिझाईनची जबाबदारी मेट्रोची राहील. बस थांब्याची ५ वर्षाच्या आत काही पडझड/तुटफुट झाल्यास त्याची दुरुस्ती मेट्रोने करावयाची आहे.

वरील अटींसह सदरचे काम ३० दिवसांत पुर्ण करुन बसथांबा मनपाच्या ताब्यात देणेत यावा.

कार्यकारी अभियंता
स्थापत्य बीआरटीएस
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८

प्रत– १) मा.आयुक्त, पिं.चिं.मनपा पिंपरी-१८
२) मा. सह शहर अभियंता, बीआरटीएस स्थापत्य
३) वाहतुक व्यवस्थापक, पुणे परिवहन महामंडळ लि.
यांना माहितीसाठी सविनय सादर.

42/B.Shete /Jan 2020